।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

EXAMINATION SECTION

Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

संदर्भ : परीक्षा/२०२०-२१/६०३ दिनांक : १२/११/२०२०

परीपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर व परभणी
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास केंद्र, किनवट
मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : उन्हाळी २०२० परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त परीक्षा सुधारीत तारखाबाबत.
संदर्भ : परीक्षा विभागाचे पत्र क्र. परीक्षा/२०२०-२१/५७५ दिनांक : ०६/११/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षातील दोन्ही सत्राच्या उन्हाळी २०२० परीक्षा हया दिनांक १५/१०/२०२० ते २९/१०/२०२० दरम्यान ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने विद्यापीठा मार्फत घेण्यात आलेल्या आहेत. या परीक्षेदरम्यान जे विद्यार्थी तांत्रिक व इतर कारणांमुळे सदर परीक्षा देऊ शकले नाहीत किंवा अनुपस्थित होते अशा सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक २५/११/२०२० ते ०५/१२/२०२० दरम्यान घेण्यात येणार असल्याबाबत उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आले होते.

दिनांक १०/११/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार या परीक्षेच्या तारखेमध्ये बदल करण्यात आलेला असून या अंतीम वर्षातील दोन्ही सत्राच्या परीक्षा आता **दिनांक ०२/१२/२०२० ते १५/१२/२०२०** या दरम्यान आयोजित करण्यात येत आहेत. सदर परीक्षा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येतील. सदर परीक्षेकरीता विद्यार्थीसंख्या लक्षात घेता कमीतकमी परीक्षा केंद्र देण्याचा निर्णय झालेला आहे.

तसेच वरीलप्रमाणे अंतीम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मागील वर्षाच्या बॅकलॉग विषयाची परीक्षा महाविद्यालय स्तरावर दिनांक ०२/१२/२०२० ते दिनांक १५/१२/२०२० या कालावधीत घेण्यात यावी.

सबब, वरीलप्रमाणे विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक व परीक्षा केंद्राची यादी लवकरच विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. विद्यार्थ्यांना उन्हाळी २०२० परीक्षेसाठी देण्यात आलेले बैठक क्रमांक व प्रवेशपत्र वापरण्यात यावेत. सदर बाब सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी.

(डॉ. रवि एन. सरोदे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति माहितीस्तव :
०१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
०२. मा. प्र-कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
०३. मा. अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ